Review Of Research
Vol. 4 | Issue. 6 | March. 2015
Impact Factor : 3.1402 (UIF)
ISSN:-2249-894X
Available online at www.ror.isrj.org

ORIGINAL ARTICLE

# सोलापुरचा इतिहास

**Kodalkar Ashok Vithoba**

MA History, MA Politics, B.Ed. M.Phil.
Head of department of history KBP pandharpur

***सारांश :***

**सोलापूर** शहर हे दक्षिण महाराष्ट्रातील एक प्रमुख शहर असून ते सोलापूर जिल्ह्याचे प्रशासकीय मुख्यालय आहे. सोलापूरला कापड गिरण्यांचे शहर म्हटले जाते. विडी उत्पादनात सोलापूरचा महाराष्ट्रात वरचा क्रमांक आहे तर 'सोलापूरी चादरं' प्रसिद्ध आहेत.

***प्रस्तावना***

सोलापूराचे प्राचीन रहिवासी श्री.सिद्धेश्वर यांनी या परिसरात अनेक शिवलिंगांची स्थापना केली. सोलापूर तलाव बांधून त्यांनी सोलापूराची पाणी समस्या सोडवली. सोलापूर हे भारतातील मुख्य अशा उत्तर-दक्षिणरेल्वे मार्गावर असल्याने त्यास महत्त्व प्राप्त झाले आहे. स्वातंत्र्यप्राप्तीपूर्वीच सोलापूर शहराने ९-११ मे १९३० या काळात ३ दिवसांचे स्वातंत्र्य उपभोगले. या घटनेमुळे स्वातंत्र्य संग्रामादरम्यान मलप्पा धनशेट्टी,जगन्नाथ शिंदे, कुर्बान हुसेन व

किसन सारडा यांना जानेवारी १२, १९३१ रोजी ब्रिटिशांनी सोलापूरमध्ये फाशी दिली. तेव्हापासून शहरास हुतात्म्यांचे शहर म्हणून ओळखले जाते.

पंढरपूर हे महाराष्ट्राचे कुलदैवत सोलापूरजवळ असून अक्कलकोटचे प्रसिद्ध स्वामी समर्थ मंदिर सोलापूर जिल्ह्यात आहे. येथील शिवगंगा मातेच्या मंदिराचा कळस शंभर तोळे सोन्यापासून बनलेला आहे, आणि दरवाजा ऐंशी किलो चांदीपासून बनलेला आहे. सोलापूर येथील भुईकोट किल्ला, हुतात्मा बाग, इंद्रभुवन, शुभराय ही भेट देण्यासारखी ठिकाणे आहेत.

इतिहास

सोलापूरला एक ऐतिहासिक वारसाही लाभलेला आहे. इ.स.पू. २०० वर्षापासून सातवाहन, चालुक्य, राष्ट्रकूट, यादव, बहामनी, अहमदनगरची निजामशाही, आदिलशाही, मराठे-पेशवे व ब्रिटिश या सर्व राजवटी सोलापूर जिल्ह्याने अनुभवल्या. यादवांच्या काळात या भागाला सोन्नलगी म्हटले जात होते. मुघल राजवटीत यास संदलपूर असेही म्हटले जात होते. ब्रिटिश काळात सोलापूर हे नाव रूढ झाले असावे असा अंदाज व्यक्त केला जातो. सोलापूरचा इतिहास रोमांचक आहे. मुंबई-चेन्नई रेल्वे मार्गावरील महत्त्वाचे स्थानक असल्यामुळे स्वातंत्र्यपूर्व काळात राष्ट्रीय पातळीवरील सर्व राजकीय-सामाजिक घडामोडींचे पडसाद सोलापूमध्ये उमटत असत. पहिल्या महायुद्धानंतर भारतात

कामगारांनी मोठा संप पुकारला. सोलापूरलाही जानेवारी, १९२० मध्ये कामगारांनी ब्रिटिश साम्राज्यशाहीच्या विरोधात संप पुकारला होता.१९३० च्या सविनय कायदेभंग चळवळीत सोलापूरकर हिरिरीने सहभागी झाले होते. या सत्याग्रहात दारुबंदीचा प्रचार करण्यासाठी काही तरुण कार्यकर्त्यांनी मोर्चा काढला. या वेळी शंकर शिवदारे हा तरुण तिरंगा हातात घेऊन पुढे धावला व ब्रिटिशांच्या गोळीबारात बळी पडला. हा शंकर शिवदारे सोलापूरचा पहिला हुतात्मा. या हौतात्म्यामुळे सोलापूरकर पेटून उठले. पण दि. ८,९ मे, १९३० या दोन दिवसांत तत्कालीन कलेक्टर नाईट याने जमावांवर अमानुष गोळीबार केला. अनेक नागरिक गोळीबारात बळी पडले. या आंदोलनादरम्यान दि.९,१०,११ मे, १९३० असे तीन दिवस सोलापूर ब्रिटिशांच्या अधिपत्याखाली नव्हते, मुक्त होते. भारतातील (काही काळासाठी) □स्वतंत्र□ झालेला असा हा पहिला भाग! मे- जून, १९३० मध्ये सुमारे ४९ दिवस मार्शल लॉ हा कायदा सोलापूरला लागू होता. या काळात सोलापूरच्या ४ निरपराध युवकांना फाशी देण्यात आले. अब्दूल कुर्बान हुसेन, मल्लप्पा धनशेट्टी, श्रीकिसन सारडा व जगन्नाथ शिंदे हे सोलापूरचे युवक दि. १२ जानेवारी, १९३१ रोजी धीरोदात्तपणे फासावर चढले. या प्रेरणादायी क्रांतिपर्वामुळेच सोलापूरला हुतात्म्यांचे शहर म्हटले जाते. पुतळ्यांच्या माध्यमातून आज या हुतात्म्यांची स्मृती सोलापुरात

जतन करण्यात आली आहे. १९३०-३१ मधील या घटनांचे संदर्भ तत्कालीन केसरी मध्ये आढळतात. १२ जानेवारी १९३१ रोजी या लढ्यातील चार वीर फाशी गेले. आजही तो दिवस सोलापूरकर हुतात्मा दिन म्हणून पाळतात. तसेच पूर्वीचे गिरणगाव, हुतात्म्यांचा जिल्हा; सध्याचे ज्वारीचे कोठार, तेलगू, कन्नड व मराठी असा भाषा-त्रिवेणी संगम झालेला बहुभाषिक जिल्हा आणि टॉवेल, चादरी निर्माण करणारा जिल्हा म्हणून सोलापूर प्रसिद्ध आहे. पर्यटन, फलोत्पादन, कृषी प्रक्रिया उद्योग, शिक्षण, आरोग्यसेवा व कापड उद्योग (हातमाग, यंत्रमाग) या क्षेत्रांमध्ये जिल्ह्याचा विकास साधण्याची क्षमता निश्चितच आहे.

सोलापूर शहरात भुईकोट प्रकारचा किल्ला आहे. हा किल्ला 'सोलापूरचा भुईकोट किल्ला' म्हणून ओळखला जातो. भारत सरकारने या किल्ल्याला दिनांक ४ डिसेंबर, इ.स. १९३० रोजी महाराष्ट्रातील राष्ट्रीय संरक्षित स्मारक म्हणून घोषित केलेले आहे.[१]

मध्यकालीन इतिहासामध्ये सोलापूरच्या किल्ल्याला अतिशय महत्वाचे स्थान प्राप्त झाले होते. बहमनींच्या राज्याची शकले उडाल्यावर त्यातून पाच शाह्या निर्माण झाल्या. या पाच शाह्यांनी आपली वेगळी चूल मांडली. या पाचही

राजवटीच्या मध्यवर्ती ठिकाणी सोलापूरचे भौगोलिक स्थान होते. त्यामुळे सोलापूरचे महत्त्व वाढले.

सोलापूरचा किल्ला नेमका कोणी बांधला या बाबत अजूनही तज्ज्ञां मध्ये एकवाक्यता आढळत नाही. काहींच्या मते हिंदू राजांच्या काळात बांधलेल्या या किल्ल्याभोवती महमूद गावान याने दुसरी तटबंदी बाहेरून बांधून किल्ला अभेद्य केला. महमूद गावान हा बहमनी सुलतान महंमदशाह याचा दिवाण होता.

इतिहासातील अनेक घटनांचा साक्षीदार असलेला सोलापूरचा किल्ल्या अनेक राजवटीचे आश्रय स्थान होता. या ऐतिहासिक घटनांमध्ये एक गमतीशीर मजाही आहे. ती म्हणजे 'सोलापूरचा किल्ल्लाथ' हा लग्नामध्ये हुंडा म्हणून दिल्याची नोंद आहे. ही नोंद एकदा नाही तर दोन वेळा आहे.

अहमदनगर येथे बुऱ्हाण निजामशहा गादीवर होता. तर, विजापूर येथे इस्माईल आदिलशहा सत्तेवर होता. त्यांच्यामध्ये सलोख्याचे संबंध प्रस्थापित झाले होते. हे संबंध दृढ करण्याच्या दृष्टीने एक विवाह संबंध घडवून आणण्यात आला. आदिलशहाच्या कन्येला बुऱ्हाण निजामशहाला देऊन हा लग्नसमारंभ धुमधडाक्यात साजरा करण्यात आला. हा विवाह सोलापूरच्या किल्ल्यामध्ये झाला. त्यावेळी म्हणजे, इ.स. १५२३ मध्ये हा किल्लार

Review Of Research
Vol. 4 | Issue. 6 | March. 2015
Impact Factor : 3.1402 (UIF)
ISSN:-2249-894X Available online at www.ror.isrj.org

विजापूरच्या ताब्यात होता. जावयाला हुंडा म्हणून 'सोलापूरचा किल्ला.' देण्याचे आदिलशहाने जाहीर केले होते. पण विवाहानंतर आदिलशहाने हा किल्लात देण्याचे नाकारले. त्यातून पुढे निजामशहा आणि आदिलशहा यांच्यात युद्धही झाले. या युद्धात जावई निजामशहाचा पराभव झाला. दुसऱ्यावेळी इ.स. १५५२ मध्ये अहमदनगरची राजकन्या चांदबिबी अली आदिलशहाला देण्यात आली. तर अली आदिलशहाची बहीण हदिया सुलताना हिचा विवाह मुतर्जा निजामशहाशी करण्यात आला. तेव्हा मात्र कबूल केल्याप्रमाणे निजामशहाने हा किल्ला विजापूरच्या सुलतानाला हुंडा म्हणून दिला.

सोलापूरचा किल्लाल बहमनी, आदिलशाही, निजामशाही नंतर मोगल सत्तेत आला. औरंगजेबाच्या कारकिर्दीत त्याचा बराच काळ या किल्ल्याच्या परिसरात गेला. पुढे हैदराबादच्या निजामाच्या आणि नंतर मराठ्यांच्या ताब्यात हा किल्ला. गेला.

सोलापूरचा किल्ल् दुहेरी तटबंदीचा आहे. खंदकाच्या आत असलेल्या या दुहेरी तटबंदीमुळे सोलापूरचा किल्ला अभेद्य आणि बलदंड झालेला आहे. याच्या बाहेरील तटबंदीमध्ये चार कोपऱ्यांवर चार बलदंड बुरूज आहेत. या बुरुजांना एकमेकांना जोडणाऱ्या तटबंदीमध्ये आणखी २२ बुरूज बांधून बुरुजांची एकभक्कम साखळीच निर्माण करण्यात आली. साधारण तीस फूट

उंचीची तटबंदी असून त्यावर जागोजाग मार्‍यासाठी छिद्रे केलेली दिसतात. बुरुजांवर तोफा ठेवण्याची सोय करण्यात आली आहे.

बाहेरील भक्कम तटबंदीच्या आत असलेली दुसरी तटबंदी उंच आहे. याच्याही चार कोपर्‍यांवर चार बुरूज असून ते अधिकच उंच बांधण्यात आलेले आहेत. या बुरुजांवरून दूरवर टेहळणी करता येत असे. किल्ल्याच्या एका बाजूला सिद्धेश्वर तलावामुळे नैसर्गिकपणा आला आहे.

सोलापूरचा किल्लाआ हा पुरातत्त्वखात्याच्या अखत्यारीत आहे. किल्ल्यात प्रवेश करण्यासाठी नाममात्र शुल्क आकारण्यात येते. किल्लार आणि त्याचा परिसर सुशोभित केलेला आहे. किल्ल्याचे दरवाजे अतिशय भक्कम असून शहर दरवाजा, हत्ती दरवाजा, खाती दरवाजा अशा नावानी ते ओळखले जातात. किल्ल्यामध्ये ध्वस्त झालेले मंदिर तसेच अनेक इमारतीचे अवशेष पहायला मिळतात. नागबावडी विहीर आणि इंग्रजकालीन तोफा ही वैशिष्ट्यपूर्ण आहेत.

इतिहास आणि भक्कम बांधकाम यामुळे सोलापूरचा किल्लाी आपल्या स्मरणात राहतो.

सिद्धरामेश्वकरांच्या वास्तव्याने पुनित झालेली भूमी म्हणून सोलापूरचा गौरव होतो.आणि सार्थही आहे.ऐतिहासिकदृष्ट्या महत्त असलेल्या शहरातला हा

भुईकोट किल्ला महाराष्ट्रातील प्राचीन दुर्गातील मानला जातो.आजही तो प्राचीन इतिहासाची साक्ष देत दिमाखात उभा आहे. सोलापूर शहराचे हे वैभव आहे.

हा किल्ला निश्चिशत केव्हा बांधला याबद्दल तज्ज्ञांमध्ये मतमतांतरे आहेत. कँपेबल यांच्या मते बहामनी बादशहा महमदशहा यांच्या कारकीर्दीत इ. स. १३५८ ते १३७५या दरम्यान बांधला असावा तर डॉ. हंटर म्हणतात १३४५सालात तो बांधला.याशिवाय तोरो यांनी सचित्र महाराष्ट्र पुस्तकात किल्ल्याचा बाहेरील कोट इ.स.१३१३ मध्ये हसन गंगु बहामनी यांनी बांधला.मात्र आतील कोट हिंदू राजांनी १२व्या शतकात बांधला अशी माहिती नमूद केली आहे.सोलापूरचे मल्लिकार्जुन पाटील यांनी हा किल्ला इ.स. १४५६ साली बांधला असे आपले मत नोंदवून ठेवले आहे.दुसरा महंमदशहा बहामनी (१४६६ ते १४८२) यांचा हुशार दिवाण महमद गवान याने सोलापूर व परांडा हे दोन्ही सारखीच बांधण असलेले किल्ले एकाचवेळी बांधले असावेत असे काहींचे मत आहे.

संपूर्ण किल्ल्याची बांधणी एकाच काळात पूर्ण झाली नाही.त्यात वेळोवेळी विविध इमारतींची भर पडत गेली आणि फेरफार होत गेले ही गोष्ट निर्विवाद सत्य आहे.किल्याच्या पहिल्या म्हणजे हत्ती दरवाजाचे दुरुस्तीचे व लोखंडी खिळे बसविण्याचे कल्ला इंग्रजानी घेण्यापूर्वी आठ वर्षे अगोदर झाले

होते.किल्याच्या बांधकामात पूर्वीचे दगड हिंदू इमारतीपैकी असून, त्यापैकी कांही १२/१३व्या शतकातील असावेत.किल्यात हेमाडपंथी अवशेषही आहेत.

अभेद्य तटबंदी असलेल्या किल्यात एकेकाळी ३००घरे होती. पूर्वीच्या बहुतेक इमारती पडून गेल्या.ज्या उरल्या त्यापैकी मशिदीचा उपयोग ब्रिटीशांनी सुरुवातीच्या काळात दारुगोळा साठवण्यासाठी केला.पुढे स्टोअर म्हणूनही वापर झाला.१९१७ साली किल्याच्या आतील तटात उत्तरेच्या बाजूला भिंतीच्या आता बुजले गेलेले क देऊळ असल्याचे पुराणवस्तू खात्याच्या नजरेस आले.१९१९ साली गव्हर्नर जॉर्ज लॉईड यांच्या परवागीनंतर उत्खनन केल्यानंतर चालुक्य देवालय आढळले.शिवसेवकाची एक मूर्ती आढळली.शिवलिंग मात्र आढळले नाही. या देवालयातील मूळशिवलिंग गावात आणून हल्लीचे श्री मल्लिकार्जुन मंदिर बांधल्याचे सांगण्यात येते.असा हा सोलापूर वैभव असलेला हा किल्ला आजही इतिहाची साक्ष देत दिमाखात उभा आहे.

- किल्ला निश्चित केव्हा बांधला याबद्दल मतमतांतरे आहेत. कॅंपबेल यांच्या मते १३५८ ते ७५, डॉ.हंटर म्हणतात १३४५ तर सरकारच्या पुराणवस्तू संशोधन खात्याच्या मते आदिलशाही बादशहा अली यांच्या कारकीर्दीत १५७८ ला बांधला असावा.

▪ (पुराणवस्तू संशोधन खात्याचा वार्षिक रिपोर्ट १९१९-२० नुसार) तोरो यांनी सचित्र महाराष्ट्र पुस्तकात इ.स. १३१३ मध्ये हसन गंगू बहामनी यांनी बांधला. आतील कोट हिंदू राजांनी इ.स.१२व्या शतकात बांधला असे नमूद केले आहे.

▪ किल्यात एकेकाळी ३००घरे होती.मात्र पूर्वीच्या बहुतेक इमारती पडून गेल्या.

▪ किल्ला बांधताना बुरुज ढासळू लागल्याने लिंगायत गरोदर स्त्रीचा बळी दिला.या बलिदानाबद्दल जा घराण्याकडे गावची पाटीलकी देण्यात आली, असे मुंबई गॅझेटियने नमूद केले आहे.

किल्ल्याच्या बांधणीसंबंधी एक दंतकथा सांगितली जाते. किल्ल्यासाठी जागा शोधण्यासाठी अंमलदारांचा मुक्काम सोलापुरात पडला.हल्लीच्या किल्ल्याच्या जागेतील मल्लिकार्जुन श्री मल्लिकार्जुन देवळाच्या जागेत हिंडणारा कोल्हा त्यांच्या दृष्टीस पडला.त्या कोल्ह्यावर अंमलदारांच्या शिकारी कुत्र्यांची नजर पडली. त्या कोल्ह्यावर कुत्र्यांनी हल्ला केला, मात्र निसर्गक्रमानुसार कोल्हा पळून गेला नाही.पण कोल्ह्याने कुत्र्यावर हल्ला करुन त्यालाच आपल्या हद्दीबाहेर पळवून लावले.हा या जागेचा विलक्षण प्रभाव पाहून अंमलदारांनी किल्ला याच ठिकाणी बांधण्याचे निश्चित केले. पुढे त्या ठिकाणी भुईकोट किल्ल्याची उभारणी झाली. मात्र तो नेमका कोणत्या काळात

Review Of Research
Vol. 4 | Issue. 6 | March. 2015
Impact Factor : 3.1402 (UIF)
ISSN:-2249-894X Available online at www.ror.isrj.org

झाला यामध्ये संशोधकांमध्ये वेगवेगळी मते आढळून येतात. इंग्रज राज्याचे स्थापनेनंतर लढाईचेतंत्र बदलले.किल्याची जरुरी वाटेनाशी झाली.त्यामुळे किल्ला पाडण्याची कल्पना उद्भवली.मात्र सोलापूर नगरपालिकने १८८६ साली गव्हर्नर आल्यानंतर शहराचे ऐतिहासिक वैभव पाडले जाऊ नये म्हणून खपट केली.त्याचा उपयोग झाला आणि किल्ला बांधण्याची कल्पना इंग्रजानी सोडून दिली.म्हणूनच आज हा किल्ला पहावयास मिळतो आहे.

**Sandarbh :**

1)http://solapur.gov.in/

2)http://solapurdarshan.blogspot.in/2013/12/buikot-killa-solapur.html

3)http://epaper.lokmat.com/epapermain.aspx?queryed=90&eddate=12%2f04
%2f2013